# भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका

**Thore Shivaji Dattatraya**

Ph. D,M. Phil.M.Com, M.A. (Eco), M.A.(Pol), M.A. (Mar), G.D.C & A, B.Ed (Gen), B.Ed (Phy), Arts, Science & Commerce College, Manmad, Dits. Nasik(M.S.), Research guide Pune, Univercity(Bus.Adm. & Business Practices)

## 1. प्रस्तावना (Introduction)

भारत देशात सध्या मोठ्या प्रमाणात सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर, औद्योगीकरण झाले आहे. शिक्षणाचा प्रसार, संदेशवहन ,वाहतूक , अभियांत्रिकी , माध्यमे इ. सर्वांचा विकास होऊन देश प्रगतीच्या दिशाने वाटचाल करीत आहे. आयात-निर्यात तून देशी, विदेशी व्यापार वाढला आहे. उद्योजकता विकास होऊन पर्यायी वस्तूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होऊन बाजारपेठांत विविध पर्यायी वस्तूने सजले आहे. ग्राहकांच्या आवडीनुसार वस्तू मिळत आहे . यातून ग्राहक वर्ग समाधानी आहे. ही सर्व किमया शेतीतून कच्चामाल मिळतो म्हणून शक्य आहे. आजही भारतात 70% लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहे. अत्यंत प्राचीन काळापासून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'महात्मा गांधींनी' तर शेती म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा “आत्मा” आहे. जगात भारत कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो.

भारत देशातील जनतेला लागणारे अन्नधान्य, उद्योगांना लागणारा कच्चामाल शेती व्यवसायातून मिळतो. म्हणून शेतीला अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते. भारत देशात जमीन विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. शेती क्षेत्रामुळे देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, रोजगार, कच्च्या मालाची उपलब्धता, अन्नधान्याचा पुरवठा, आर्थिक विकास, देशी विदेशी व्यापार, व्यवसाय आणि उद्योजकता वाढ ,विकास व वृद्धी होण्यासाठी शेती क्षेत्राची भूमिका फार महत्त्वाची आहे.

## 2. उद्दिष्टे (objectives)

1. आधुनिक तंत्राचा वापर इत्यादींबाबत अभ्यास करणे.

2. मान्सूनची अनियमितता बाबत अभ्यास करणे.

3. देशाच्या अर्थव्यवस्थेत स्थिरता बाबत अभ्यास करणे.

4. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका बाबत अभ्यास करणे.

5. शेतीची उत्पादकताबाबत अभ्यास करणे.

6. शेतीचे उत्पादन वाढीसाठी उपाय बाबत अभ्यास करणे.

**3. गृहितके:- (Hypothesis)**

1. आधुनिक तंत्राचा वापर इत्यादींबाबत अभ्यास करीत आहे.

2. मान्सून बाबत अभ्यास करीत आहे.

3. अर्थव्यवस्था स्थिरतेबाबत बाबत अभ्यास करत आहे.

4. अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका बाबत अभ्यास करीत आहे.

5. शेतीच्या उत्पादकता बाबत अभ्यास होत आहे.

6. उत्पादन वाढीबाबत संशोधन होत आहे.

**4. आधुनिक तंत्राचा वापर**

स्वातंत्र्यानंतर भारतात शेतीत अनेक सुधारणा झाला. मशागतीसाठी आधुनिक पद्धतीचे अवजारे यंत्रे उपलब्ध झाली. रासायनिक खते, सुधारित बियाणांचा शोध लागला. पाणीपुरवठ्याच्या सोयीचा विस्तार झाला. कर्जपुरवठा करणाऱ्या पतसंस्था निर्माण झाल्या. शेतकरी वर्गातील अज्ञानता व निरक्षरता कमी झाली. तरीही शेतकऱ्यांची उदासीनता कायमच आहे. याचे महत्त्वाचे कारण आधुनिक शेती करणे खर्चिक आहे. शेतीतून मिळणारे उत्पन्न अत्यंत कमी आणि अनिश्चित आहे. भारतीय शेती निसर्गावर अवलंबून असल्याने उत्पादन वाढलेच असे नाही. कारण निसर्गावर नियंत्रण ठेवता येत नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान पिक विमा योजनेमुळे भरून निघाले तर नवीन पद्धतीने पीक घेण्याची मानसिकता शेतकरी वर्गात होऊ शकते. विमा योजनेमुळे शेतकरी वर्गाच्या दृष्टिकोनात बदल होण्यास मदत होऊ शकते. यातुन उत्कृष्ट पद्धतीने शेती करून उत्पादनात वाढ होऊ शकते.

**5. मान्सूनची अनियमितता**

भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. येथील शेती हा मान्सून चा जुगार आहे. भारतीय जनतेचा शेती हा मुख्य व्यवसाय असून 75% लोक शेती व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करतात. भारतीय शेतीचे भवितव्य बऱ्याच प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. पाऊस जर चांगला आणि योग्य झाला तर शेतीतून उत्पादन चांगले येते.

भारताचे भौगोलिक क्षेत्र बरेच मोठे आहे. विविध प्रदेशात पावसाचे असमान वितरण होते. आसाममध्ये चेरापुंजी येथे वार्षिक सरासरी 11.419 मिलिमीटर पाऊस पडतो. तर राजस्थानमध्ये फक्त 9 ते 10 इंच पाऊस पडतो. कधी पाऊस जास्त पडतो आणि पुरामुळे नुकसान होते. तर कधी दुष्काळामुळे नुकसान होते. यातून मार्ग काढण्यासाठी पिक विमा काढणे अत्यंत आवश्यक आहे.

**6. देशाच्या अर्थव्यवस्थेत स्थिरता:-**

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम देखील होतात. पीक बुडाले तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होते त्यामुळे त्यांची क्रय शक्ती कमी होते. कारण उत्पादन कमी त्यामुळे त्यांच्याकडे पैसा राहत नाही त्यामुळे बाजारात विक्रीसाठी आलेल्या वस्तूंची खरेदी करू शकत नाही, याचा परिणाम उत्पादनावर होतो. कामगार बेकार होतात ते संप बंद घडून आणतात. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत व अस्थैर्य निर्माण होते यावर प्रभावी उपाय म्हणजे पीक विमा योजना होय. या योजनेमुळे शेतकरी वर्गाच्या उत्पन्न अस्थिरता येते. त्यांना विविध वस्तू खरेदी करता येतात त्यामुळे उत्पादन कमी करावे लागत नाही. कारण खरेदी- विक्री बाजारात चालू असते. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत पिक विमा योजनेमुळे स्थैर्य टिकून राहू शकते यात शंका नाही.

**7. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका:-**

**(Role of agriculture in Indian economy)**




भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा मोठ्या प्रमाणात आहे. 1951 मध्ये हा वाटा 56.5% एवढा होता. नियोजनांतर्गत औद्योगिक क्षेत्र आणि सेवा क्षेत्राचा वाटा वाढल्याने शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होऊन 2010 -2011 मध्ये तो 14.4% कमी झाला आहे. असे असले तरी आजही भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व अधिक आहे. कारण शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे.

सारणी-1

एकूण GDP मध्ये शेतीचा हिस्सा

| वर्ष | शेती उत्पन्नाचा वाटा |
|---|---|
| 1999-2000 च्या किंमातीवर आधारित | |
| 1950-1951 | 56.50 |
| 1970-1971 | 45.90 |
| 1990-1991 | 34.00 |
| 2000-2001 | 24.70 |
| 2005-2006 | 19.55 |
| 2004-2005 च्या किंमातीवर आधारित | |
| 2007-2008 | 17.80 |
| 2008-2009 | 15.70 |
| 2009-2010 (QE) | 14.60 |
| 2010-2011(RE) | 14.40 |

SO. National accounts statistics 2010 [2004-2005 prices]

QE = Quick Estimates, RE = Revised Estimates.

भारतात आजही 70 टक्के जनता ग्रामीण रोजगारावर आणि शेतीवर आधारित उद्योग धंद्यांवर अवलंबून आहे. 2007 मध्ये घेण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार भारतीय शेतीत निर्माण होणारा रोजगार पुढीलप्रमाणे आहे.

सारणी-2

लोकसंख्या आणि शेतीतील कामगार.

| विवरण | 1951 (दशलक्ष) | 2001 (दशलक्ष) |
|---|---|---|
| भारतातील एकुण लोकसंख्या | 361 | 1029 |
| एकुण कामकरी लोकसंख्या | 140 | 401 |
| शेतीवर कामकरी लोकसंख्या | 98(70%) | 235(59%) |
| शेतकरी | 70(50%) | 128(32%) |
| शेतमजुर | 28(20%) | 107(27%) |

वरील सारणीवरून भारतातील शेती व्यवसायातून निर्माण होणारा रोजगार स्पष्ट होतो. 1951 मध्ये 70% रोजगार होता. तो कमी होऊन 2001 मध्ये 59% एवढा झाला तसेच शेतकऱ्यांची संख्या 50% वरून 32% व एवढी कमी झाली. शेतमजुरांची संख्या 20% वरून 27% एवढी वाढली आहे. वरील विवेचनावरून शेतीमधील समस्या/ अडचणीची तीव्रता दिसून येते.

**8. शेतीची उत्पादकता [Productivity of Agriculture]**

शेती व्यवसाय भारतीय जनतेचा प्राचीन काळापासून मुख्य व्यवसाय शेती हे बहुसंख्य जनतेच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. परंतु मात्र इतर देशांच्या तुलनेत दुर्दैवाने भारतीय शेतीची उत्पादकता बरीच कमी झाली आहे. परंतु भारतीय शेतीच्या उत्पादनाचे निरनिराळ्या वर्षातील आकडे वाढत असल्याने दिसून येते.

सारणी 3

काही निवडक देशांची प्रती हेक्टर उत्पादकता (2006 )

| विवरण | भारताचे अन्नधान्य उच्च उत्पन्न क्षमता | भारताचे प्रत्यक्ष उत्पन्न | जगातील प्रमुख उच्च उत्पन्न क्षमता | देश | जगातील उच्च उत्पन्न | देश |
|---|---|---|---|---|---|---|
| तांदुळ | 40 ते 58 | 31.20 | 62.50 | चीन | 106.00 | इजिप्त |
| गहु | 60 ते 68 | 26.20 | 44.50 | चीन | 80.30 | इंग्लंड |
| मका | 60 ते 80 | 19.40 | 93.70 | अमेरिका | 93.40 | अमेरिका |
| ऊस | - | 680 | 72.30 | ब्राझील | 939 | इजिप्त |
| भूईमूग | 20 ते 30 | 8.6 | 31.20 | चीन | 31.20 | चीन |

(Agricultural statistics at a glance 2008)

✥ भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेची कारणे :-

(Causes of Less Productivity of Indian Agriculture)

भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या शेतीची उत्पादकता अत्यंत कमी आहे. ही एक चिंतेची बाब आहे . उत्पादकता कमी असण्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.




भारतात शेतीसाठी जुने तंत्र वापरले जाते. शेती करण्याचा उद्देश असूनही उदरनिर्वाहाचे साधन आहे. शेतीकडे व्यवसाय या दृष्टीने पाहिले जात नाही. शेतमाल विपणन पद्धती आणि व्यवस्था अत्यंत दोषपूर्ण आहे. माल साठवण करण्यासाठी योग्य गोदामांची सोय नाही. वाहतुकीच्या सोयी कमी, व्यापारी दलाल आणि शेतकऱ्यांची फसवणूक आणि पिळवणूक करीत असतात. भारताची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्या मानाने रोजगारांचे प्रमाण न

वाढल्याने लोकसंख्या वाढीचा सर्व भार शेतीवर पडतो शेती लहान-लहान तुकड्यांमध्ये विभाजित झाल्याने शेतीचा आकार व अनार्थिक झाला. त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली. भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. आधुनिक बीयाणे, रासायनिक खताचा कमी वापर ,भांडवल तुटवडा इत्यादींमुळे शेतीची उत्पादकता कमी आहेत परंतु अलीकडे तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाल्याने शेतीची उत्पादकता वाढत आहे.

**9. शेतीची उत्पादकता वाढविण्याचे उपाय**

**[Measure To Increase the Agricultural Productivity ]**




स्पर्धेच्या युगात शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांचा भार कमी करण्यासाठी नवीन उद्योगांची स्थापना करणे, लघु आणि कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे इत्यादी विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या जाऊ शकतात लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवून शेतीवरील लोकांचा भार कमी करता येतो. लोकसंख्या नियंत्रित करणे हीच खरी

काळाची गरज आहे भारतात भु- सुधारणेसंबंधी कायदे करण्यात आले आहेत. या सर्व कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास शेतीची उत्पादकता निश्चितच वाढेल “कसेल त्याची जमीन” या तत्त्वाची अंमलबजावणी केल्याने शेती उत्पादन घेण्यास शेतकऱ्यांची भूमिका सकारात्मक होईल याशिवाय “कमाल जमीन धारणा” आणि “सहकारी शेती” यासारख्या धोरणांची अंमलबजावणी करून शेतीची उत्पादकता वाढविता येते. भारतीय शेती मान्सूनवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीला पुरेसा नसतो. त्यामुळे उत्पादनात घट होते म्हणून पाणीपुरवठ्यात वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेती उत्पादनात वाढ होईल. तसेच शेतीचे उत्पादन वाढीसाठी मशागतीसाठी अत्याधुनिक साधनांचा उपयोग करणे आवश्यक आहे. सुधारित बियाणे, रासायनिक खतांचा वापर केला पाहिजे. भांडवलाच्या सुविधा निर्माण करून शेतमालाला हमी भाव मिळाला पाहिजे. तसेच नियंत्रित बाजारपेठाची स्थापना केली पाहिजे सहकारी समित्यांद्वारे शेतमालाची विक्री झाली पाहिजे. साठवणुकीच्या सुविधा निर्माण केल्या पाहिजे. इत्यादी मार्गांनी शेतीचे उत्पादन वाढून शेतकरीवर्ग आनंदी, समाधानी जीवन जगू शकतो.

**10. समारोप (Conclusion)**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य साधारण महत्त्व आहे. शेती व्यवसाय शेतकऱ्याचा उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. तंत्रज्ञानाचा शोध लागला तरी सुद्धा भारतीय शेतीचे महत्व व स्थान आणि भूमिका भारतीय अर्थव्यवस्थेत टिकुन आहेत. शेती व्यवसाला भारतीय लोकांच्या हृदयात अति महत्त्वाचे स्थान आहे. 70 टक्केपेक्षा जास्त लोक शेती व्यवसाय करतात. कारण शेतीतून अनेक व्यापार, व्यवसाय धंदे व उद्योजकतेसाठी कच्चा माल उपलब्ध होतो. यातून मोठा प्रमाणात रोजगार निर्मिती होती. आयात निर्यात मोठ्या प्रमाणात होऊन परकीय चलन प्राप्त होते. स्थानिक ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत मालाचे विपणन मोठ्या प्रमाणात होऊन सर्वत्र संबंध दृढ व सलोख्याचे निर्माण होतात. यामुळे माहिती तंत्रज्ञान पद्धती माहिती होते. दळणवळण, तंत्रज्ञान, माध्यमे, संदेशवहन, वाहतूक यामुळे जवळ आले आहे. म्हणून असे म्हणता येईल की भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका आईच्या छायेसारखी आहे. यापेक्षा जगात काहीच मोठे नाही.

**११.संदर्भग्रंथ:-[Reference]**

1. भारतीय अर्थव्यवस्था

डॉ. मेघा कानेटकर

श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर 440010

2. भारतीय अर्थव्यवस्था- समस्या व भवितव्य

1. डॉ. आर.के.दातीर

2. आर. एम. चिंतामणी

3. जी.जे. लोमटे

4.डॉ. सुहास आव्हाड

निराली प्रकाशन पुणे 411005

3. भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास

प्रा.डॉ. एस.के.पगार

प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

4. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र

डॉ. श.के.मोडक

विद्‍या प्रकाशन, नागपूर

5. भारताचा प्रादेशिक भूगोल

ए.पी. चौधरी

अंकुशराव आहेर

अर्चना चौधरी

प्रशांत प्रकाशन जळगाव

6. पर्यावरणीय भूगोल

१.डॉ. आर. ई. नजन

२.डॉ.जी.के. चव्हाण

३.डॉ.पी.एन. साळवे

प्रशांत पब्लिकेशन जळगाव